# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

## कृषि तंत्र विद्यालय, सेलसुरा जि. वर्धा येथिल जनावरांचा जाहीर लिलावाच्या नियम व अटी

दि. २२/०५/२०२५ रोजी सकाळी १२.०० वाजता कृषि तंत्र विद्यालय, सेलसुरा जि. वर्धा येथे जनावरांचा जाहीर लिलाव करण्यात येत आहे.

जनावरांच्या लिलावाकरीता नियुक्त अधिकारी जनावरांचा लिलाव करतील. लिलाव सुरु करण्यापुर्वी जनावरांची पुर्ण माहिती जाहीर करतील व लिलावाच्या अटी समजावुन सांगतील.

१. लिलावात बोली बोलणाऱ्याला सुरुवातील रु. १०००/– (रु. एक हजार फक्त) अनामत रक्कम म्हणुन जमा करावी लागेल. कोणत्याही व्यक्तीस अनामत रक्कम भरल्याशिवाय लिलावामध्ये बोली बोलण्यास परवानगी देण्यात येणार नाही. सर्वांची बोली पुर्ण झाल्यास व त्याने जनावरे घेण्यास नकार दिल्यास सदर अनामत रक्कम जप्त करण्यात येईल. लिलाव शेतकऱ्यांच्या हितार्थ असल्याने शेतकऱ्यांनी आधार ओळखपत्र व जमिनीचा ७/१२ दाखला सोबत आणणे आवश्यक राहील.

२. लिलावात जनावरे घेण्याची अनामत रक्कम सर्वाची बोली झाल्यानंतर बोली धारकाने जनावराची संपुर्ण रक्कम भरल्यानंतर परत करण्यात येईल. त्याचप्रमाणे अयशस्वी बोली बोलणाऱ्याची अनामत रक्कम लिलाव संपल्यानंतर परत करण्यात येईल.

३. बोली बोलतांना बोलीची रक्कम कमीत कमी रु. १००/– रुपयांनी वाढवावी लागेल. लिलावाची बोली पुर्ण झाल्यावर सर्वात जास्त बोली बोलणाऱ्याचे नांव जाहीर करुन लिलावाची प्रकीया पुर्ण करण्यात येईल.

४. ज्या व्यक्तीस बोली मंजुर झाली त्या व्यक्तीस मंजुर झालेल्या बोलीच्या किंमती एवढी पुर्ण रक्कम त्वरीत अदा करावी लागेल. लिलावात खरेदी केलेल्या जनावरांची पूर्ण किंमत भरुन संबंधीत बोली धारकांना सदर जनावरे ताबडतोब स्वतःच्या ताब्यात घ्यावी लागेल व स्वखर्चाने न्यावे लागेल. सदर जनावरांची कोणतीही जबाबदारी विभागाच्या लिलाव समितीची राहणार नाही. त्याची सर्वस्वी जबाबदारी मंजुर बोलीधारकाची राहील. बोली धारकाने खरेदी केलेली जनावरे ताबडतोब ताब्यात न घेतल्यास त्याची अनामत रक्कम जप्त करण्यात येईल व संबंधीत जनावरांच्या समिती मार्फत पुन्हा लिलाव करण्यात येईल.

५. लिलावातील जास्तीत जास्त बोली स्वीकृत करणे अथवा न करणे तसेच अपेक्षेपेक्षा बोली कमी असल्यास संबंधीत जनावरे देण्याचा अथवा न देण्याचा सर्व अधिकार लिलाव समितीस राहील. त्याशिवाय लिलावात ईतर बाबतीत लिलाव समिती अधिकाऱ्यांचाच निर्णय अखेरचा व बंधनकारक राहील.

६. एकदा लिलावात विकत घेतलेले जनावरे कोणत्याही कारणाने परत घेतल्या जाणार नाही. संबंधीत बोली धारकाने जनावराचा ताबा न घेतल्यास अनामत रक्कम जप्त करुन विद्यापीठात जमा करण्यात येईल.

७. जनावरांचा लिलाव प्रत्येकाच्या बाबतीत वेगवेगळा अथवा गटागटाने करणे हे लिलाव समितीच्या मर्जीवर अवलंबुन राहील.

८. लिलाव पुर्ण करण्याचा निर्णय तसेच कोणतेही कारण न दाखवता लिलाव रद्य/स्थगीत करण्याचा अधिकार लिलाव समितीस राहील. लिलाव समितीने दिलेल्या निर्णयावर कोणतीही अपील करता येणार नाही. बोली धारकांना ही लिलाव अखेरचा व बंधनकारक राहील.

९. लिलाव समितीच्या कामकाजामध्ये अडथळा आणणे, आरडाओरड करणे किंवा दखल देणाऱ्यास लिलावातुन बाद करण्यात येईल व त्याची अनामत रक्कम सुध्दा जप्त करण्यात येईल.

१०. लिलावात सर्वांच्या बोली बोलुन जनावरे खरेदी केलेल्या बोली धारकाना सदरहु जनावरे ताब्यात घेतल्यास ती जनावरे शेती कामाकरीता पाळण्याकरीता विकत घेत असुन कत्तली साठी वापरण्यात येणार नाही असे लेखी हमीपत्र लिहुन द्यावे लागेल.

११. लिलावात विकत घेतलेले जनावरे बोली धारकाने २४ तासाच्या आत न नेल्यास रु. ५००/–प्रति दिवस दंड आकारण्यात येईल. दंडाची रक्कम न भरल्यास सदरहु बोली धारकाची अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

१२. नाव नोंदणी व अनामत रक्कम भरण्याची वेळ सकाळी १०.०० ते १२.०० वाजेपर्यंत राहील.

१३. लिलावाचे स्थळ – प्रक्षेत्र कृषि तंत्र विद्यालय, सेलसुरा जि. वर्धा प्रक्षेत्र

प्राचार्य,
कृषि तंत्र विद्यालय,
सेलसुरा जि. वर्धा